८०२ / ७९८८

वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३

२) आदेश क्र. लेखा/१अ/कावि/११२५/२०१७ दि. ०७/०१/२०१७

३) भारत सरकार, वित्त विभागाचे पत्र क्र. १/३/२००८- E.II(B) दिनांक ११/०९/२०१८

४) महासचिव, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचे पत्र दि. ११/३/२०१९

५) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र कास/२/कावि/२२/२०१७ दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय

६) मा .आयुक्त यांचेकडील दिनांक ०८/१०/२०१८ चा मान्य प्रस्ताव

७ मा .आयुक्त यांचेकडील दिनांक ०३/०७/२०१९ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग ७९८८
क्र. लेखा/१अ/कावि/८०२/२०१९
दिनांक :- ०३/०७/२०१९

**विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०१९ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...**

**आदेश,**

केंद्रशामनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन क्रमांक१/३/२००८ E.II(B) दि.०८/०३/२०१९ अन्वये केंद्र सरकारचे ज्या कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या नाहीत, त्या केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०१९ पासून १४८ टक्के वरुन १५४ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २०१९ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा. नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

७९८८ ८०२

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच मेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जानेवारी २०१९ पासून सहावा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन सरंचनेतील वेतन बॅंड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्ता १४८ टक्के ऐवजी १५४ टक्के प्रमाणे लागू करण्यात येत आहे. माहे जुलै २०१९ चे वेतन व पेन्शन बिल १५४ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. तसेच माहे जानेवारी २०१९ ते जुन २०१९ पर्यंत देय महागाई भत्याची थकबाकी माहे जुलै २०१९ चे वेतन देयका / पेन्शन बिला बरोबर काढण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,
सर्व संबंधित शाखाप्रमुख

प्रत :-

१) आयुक्त कक्ष २) मा. अति आयुक्त कक्ष

३) मा.मुख्यलेखापरिक्षक ४) मा. कामगार कल्याण अधिकारी

५) मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी ६) सहा. आयुक्त , प्रशासन

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

७) अध्यक्ष, पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ , पिंपरी – १८

२/- माहिती साठी सादर

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८